अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ११३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ ।

भाजपने टाकल्या सोंगट्या

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या अनुषंगानं, प्रमुख सर्वच पक्षांमध्ये पडद्यामागे मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. दोन्ही राष्ट्रवादीनं एकत्रित निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर अत्यंत सावध पवित्र घेत, भाजपनं रणनितीच्या सोंगट्या टाकायला सुरुवात केली आहे.माजी आमदार संजयमामा शिंदे आणि भाजप नेत्या रश्मी बागल-कोलते हे करमाळा तालुक्यातील निवडणुकांसाठी एकत्र आलेत. पालकमंत्री जयकुमार गोरेंनी शिंदे अन् बागलांमध्ये शिष्टाई घडवून आणली, दुसऱ्या बाजूला शिंदेसेनेच्या गोटातदेखील मोठ्या हालचाली सुरु आहेत. या पक्षाचे नेते आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आज सोमवार सोलापुरात येत आहेत. भाजपसोबत युती करायची की, स्व:बळावर लढायचं यासंबंधी ते आढावा घेणार आहेत.

जिथं शक्य आहे तिथं भाजपसोबत युती करु अन्यथा स्व:बळावर लढू अशी भूमिका सोमवारी रात्री उशीरापर्यंत शिंदेसेनेची ठाम होती. भाजपला स्व:बळावर लढायचे असेल, तर त्यांनी तसं जाहीर करावं, आम्ही आमचा मार्ग निवडू असंदेखील शिंदेसेनेच्यावतीनं सुचित करण्यात आलं आहे. त्यामुळं या निवडणुकांसाठी भाजप आणि शिंदेसेना युती की स्व:बळ यासंबंधीच्या निर्णयासाठी आजचा मंगळवारचा दिवस महत्त्वाचा ठरु शकतो, असं सांगण्यात आलं.

उल्लेखनीय बाब म्हणजे सध्या निवडणुकांची प्रक्रिया सुरु असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये भाजप आणि दोन्ही राष्ट्रवादींना जोरदार टक्कर देण्यासाठी यापूर्वीप्रमाणे वापरलेला समविचारी' पॅटर्नचा फॉर्म्युला आता या खेपेस वापरता येईल का? याची पडताळणी करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये नेतेमंडळींच्या बैठका होत आहेत.

करमाळ्याचं ठरलं, जागावाटप उरलं

संजयमामा -बागल एकत्र

शिंदे सेनेचं आज ठरणार

समविचारांची मोट आवळताना पेचम्पेच

मागील जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवेळी सोलापूर जिल्ह्यात समविचारीचा प्रयोग झाला, त्यावेळी संजयमामा शिंदे हे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले होते. त्या वेळी सध्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, रणजितसिंह नाईक-निंबाळकर, प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत, शहाजी पाटील आदीजण एकत्र आले होते. तत्कालीन पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांनी त्यांना पाठबळ दिले होते. मात्र अलिकडच्या काळात जिल्ह्यात मोठ्या राजकीय उलथापालथी झाल्या आहेत. त्यामुळं समविचारींची मोट आवळताना पेच निर्माण झाला आहे. बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांची भाजपशी सलगी आहे. माजी आमदार प्रशांत परिचारक हे तर प्युअर भाजपात आहे. मोहोळ तालुक्यातील लोकशक्ती परिवाराचे नेते विजयराज डोंगरे हे भाजपजवळ होते त्यांनी आता अजित पवार राष्ट्रवादी प्रवेश केला आहे. इतर तालुक्यातील नेतेमंडळीदेखील कोणत्या कोणत्या पक्षांशी जुळली गेलेली आहे. त्यातून जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी समविचारी'सोबतच्या प्रवाहात येणार कोण? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. दोन्ही राष्ट्रवादीनी एकत्रित येऊन सोलापूर जिल्ह्यातील निवडणुका लढवण्याचा निर्णय समविचारी पॅटर्नसाठी अडचणीचा झाला आहे.

शहाजीबापू, म्हेत्रेअण्णांकडून मंत्री भुसे घेणार आढावा

सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, आढावा घेण्यासाठीच किंबहुना भाजप सोबत युती किंवा स्व:बळ या संदर्भातील निर्णयाच्या टप्यापर्यंत पोचण्यासाठी शिंदेसेनेचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे दूत म्हणून शालेय शिक्षणमंत्री भुसे हे आज आवर्जून सोलापुरात येत आहेत. माजी आमदार शहाजी पाटील, माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हा संपर्क प्रमुख अमोल शिंदे यांच्याकडून ते आढावा घेऊन निवडणुकीसंबंधी मार्गदर्शन करणार असल्याचे सांगण्यात आले.

काँग्रेस अस्वस्थ; आघाडीचं काय करायचं मोठा पेच

आघाडीमधून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष बाजूला गेला. उर्वरित ठाकरे सेनेला सोबत घेऊन लढायचा निर्णय पक्का करण्याच्या पार्श्वभूमीवर, चर्चा करायची म्हटलं तर या पक्षाचे पदाधिकारी विस्कटले आहेत. ग्रामीण विभागाचे दोन जिल्हा प्रमुख पक्ष सोडून गेले, चार तालुक्यांसाठी तालुका प्रमुखांना अधिकारी दिले. एका जिल्हा प्रमुखांकडं सोलापूर शहर आणि अक्कलकोट तालुक्याची जबाबदारी आहे, या सगळ्या पार्श्वभूमीवर, चर्चेसाठी त्यातही निर्णयासाठी बोलवायचं कोणाला? याचा पेच काँग्रेससमोर सोमवारी आला.

करमाळ्याचं ठरलं, मात्र जागा वाटपाचं उरलं!

संजयमामा शिंदे हे करमाळ्याचे माजी आमदार असून त्या ठिकाणी रश्मी बागल ह्या त्यांच्या विरोधक आहेत. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचा निर्णय घेतल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी संजयमामा शिंदे आणि त्यांच्या करमाळ्यातील विरोधक रश्मी बागल यांना एकत्र आणण्यासाठी त्यांच्याशी चर्चा केली आहे. सोलापुरातील एका हॉटेलमध्ये पालकमंत्री गोरे यांच्या उपस्थितीत संजयमामा शिंदे आणि रश्मी बागल यांच्यात बैठक झाल्याची माहिती आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी दोघांना एकत्र येऊन लढण्याचा निर्णय घेतला आहे. करमाळ्यात जिल्हा परिषदेच्या ०६ एवढ्या जागा असून पंचायत समितीच्या १२ जागा आहेत. यातील कोणाला किती वाटा मिळणार, याचे उत्तर येत्या दोन दिवसांत मिळण्याची शक्यता आहे.

अजित पवार राष्ट्रवादीच्या संजयमामांची भाजपच्या बागल गटाच्या हातात हात, सगळेच चक्रावले

करमाळा विधानसभेला माजी आमदार संजयमामा शिंदे हे अपक्ष लढले तरी त्यानंतरच्या काळापासून ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संपर्कात आहेत. अशातच त्यांनी करमाळा तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी भाजप नेत्या रश्मी बागल-कोलते गटा सोबत युती केली. या अनपेक्षित निर्णयामुळं मुख्यत्वे, करमाळा, माढा तालुक्यासह अजित पवार राष्ट्रवादी आणि भाजप या दोन्ही पक्षांमधील सर्वांचेच डोळे विस्फरले. या निर्णयातून सगळेच चक्रावल्याची चर्चा सुरु आहे.

२२ जानेवारीचा 'गुरु'वार कोणासाठी ठरणार 'टर्निंग' पॉइंट?

पालिकेतील साम्राज्याच्या सिंहासनाधिशपदाचा ठरणार दावेदार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरसह राज्यातल्या २९ महानगर पालिकांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. १६ जानेवारी रोजी हाती आलेल्या निकालांनुसार २९ पैकी २४ महानगरपालिकांवर भाजपचा झेंडा फडकला आहे. मात्र उत्सुक्ता आहे ती आता महापौरपाच्या सिंहासनाची. येत्या गुरुवार (ता.२२) महापौरपदाची आरक्षण सोडत काढली जाणार आहे. सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत तब्बल ८७ नगरसेवक भाजपचे निवडून आले आहेत. या पैकी कोणत्या चेहऱ्यासाठी २२ जानेवारीचा 'गुरु'वार टर्निंग पॉइंट ठरणार? याचं औत्सुक्य टिपेला पोचणार आहे.

▸ सोलापूसह राज्यातील २९ शहरांच्या महापौरपदाची निघणार आरक्षण सोडत

▸ रोटेशन पद्धतीनं आरक्षण निघणार की बदल होणार यावरुन औत्सुक्य पोचणार टिपेला

विशेषत्वे, सोलापूरसह २९ शहरांच्या महापौरपदाची आरक्षण सोडत रोटेशन पद्धतीनं नियणार की बदल होणार, याबद्दल स्पष्टता नसली तरी यंदाची आरक्षण सोडत रोटेशन पद्धतीनं नसेल असं वृत्त माध्यमांनी दिलं आहे. मात्र याला अधिकृत दुजोरा मिळू शकलेला नाही

निवडणुकी पूर्वीच महापौरपदासाठी आरक्षण सोडत काढून महापौर पदासाठीचं प्रत्येक शहराचं आरक्षण जाहीर होणं आवश्यक होतं. परंतु, तसं झालं नाही. मंत्रालय स्तरावरुन होणारी ही प्रक्रिया आता निवडणुकीनंतर होत आहे. येत्या २२ जानेवारी रोजी २९ महानगरपालिकांसाठी आरक्षण जाहीर होईल. आरक्षणाची सोडत ही चक्राकार पद्धतीने केली जाते. मात्र ही पद्धत बदलली जाऊ शकते, अशी चर्चा आहे. सध्या एससी, एसटी, महिला आणि ओबीसी या घटकांना रोटेशन पद्धतीने आरक्षण दिलं जातं. यासंदर्भात खरंच काही बदल होणार आहेत की नाही, याची स्पष्टता नाही. मात्र काही माध्यमांनी शक्यतेचं वृत्त दिलं आहे.

असं असलं तरी गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी महापौर पदासाठीची आरक्षण सोडत प्रक्रिया पार पडेल. मुंबईत नगरविकास विभागातर्फे ही प्रकिया राबवली जाणार आहे. याबाबतची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. आरक्षणाची सोडत ही चक्राकार पद्धतीने केली जाते. मात्र ही पद्धत बदलली जाऊ शकते, अशी चर्चा आहे.

निर्निवाद सत्तेत 'मेयर'पदासाठी कोणाच्या नावावर भाजपची मेहरबानी?

सोलापूर महापालिकेच्या इतिहासात भाजपनं तब्बल ८७ जागा मिळवत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. इंद्रभवनावर निर्निवाद सत्ता प्राप्त केल्यानंतर 'मेयर' महापौरपदासाठी कोण्या नगरसेवकपदाच्या नावासाठी भाजप मेहरबानी दाखवणार, हे पाहणं अत्यंत महत्त्वाचं आहे. आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार विजयकुमार देशमुख गटाचे नगरसेवक मोठ्या संख्येने निवडून आले आहेत. कोठे गटाचा सर्वाधिक ४३ नगरसेवकांचा आकडा सांगितला जातो. कोठे गटाचाच महापौर म्हणून शहरात चर्चा असून काही नावंदेखील चर्चांमधून पुढं आली आहेत.

नगरविकास खाते कोणता निर्णय घेणार?

महापौर पदाच्या आरक्षणाच्या प्रक्रियेत यावेळी बदल केला जाण्याची शक्यता आहे. पुन्हा खुल्या प्रवर्गापासून आरक्षणाची सोडत काढली जाऊ शकते. जेणेकरून यापुढील काळात पुन्हा सर्व घटकांना या पदावर संधी मिळायला हवी. नगरविकास खात्याकडून आरक्षणाची सोडत काढली जाते. मात्र, ही प्रक्रिया पुन्हा खुल्या गटापासून सुरूवात करण्याबाबत मुख्यमंत्री स्तरावरही ही चर्चा झाली असण्याची शक्यता आहे. असे झाल्यास चक्राकार पध्दतीमध्ये आतापर्यंत आरक्षण न पडलेल्या घटकांतील नगरसेवकांची संधी हुकण्याची भीती आहे. त्यामुळे आता नगरविकास खाते याबाबत २२ तारखेपर्यंत नेमका काय निर्णय घेणार, हे पुढील काही तासांतच स्पष्ट होईल.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

सध्या राजकारणातील प्रश्नांना उत्तर देणे म्हणजे निव्वळ गाढवपणा आहे !

कल्याण
235-02-156

मुंबई
368-71-344